**नियमित फौजदारी खटला क्र. १०/२०१७**
**निशाणी क्र. ५६.**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०५ ची जबानी.**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,**

**माझे नाव -** नवनाथ भागोजी भोकनळ,
**वय -** ५० वर्षे, धंदा - शेती,
**राहणार -** तळेगाव, ता. चांदवड, जि. नाशिक.

---

**सरकारपक्षाच्या वतीने साक्षीदाराचा सरतपास श्री. एन. पी. मोरे वकिलांमार्फत शपथेवर सुरू :-**

१. मी आरोपींना ओळखतो. आरोपी न्यायालयात हजर आहेत. मी फिर्यादीला ओळखतो. मी त्यांच्या शेजारी राहतो. दिनांक २१/०९/२०१६ रोजी आरोपी व फिर्यादी यांचे आवाज झाल्यावरून मी रस्त्यावर फिर्यादीच्या घरासमोर आलो होतो. त्यावेळी त्या ठिकाणी मारामारी सुरू होती. त्यावेळी मी सोडवासोडव केली होती. त्यावेळी बेबाताई चांदखान पठाण यांच्या मुलाला हाताला दगड लागला होता. या व्यतीरीक्त मला काही माहिती नाही.

**सदर साक्षीदार अभियोग पक्षाला सहकार्य करीत नसल्याने सरकारी वकिलांनी साक्षीदाराला उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. सरकारी वकिलांना कलम १५४ प्रमाणे उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे आहे की, बेबाताई यांच्याकडे त्यांची वडिलोपार्जित जमीन आहे व त्यांच्या शेताशेजारी आरोपींची शेतजमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या दोघांच्या शेतजमीनीमधून इतर लोकांना जाण्याकरीता खडया गोटयांचा शिवार रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २१/०९/२०१६ रोजी त्या रस्त्यावर खड्डे पडले होते म्हणून बेबाबाई व तिच्या मुलीने त्या ठिकाणी मुरूम व गोटे टाकूण सदर खड्डे भरले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आरोपींना फिर्यादीने व तिच्या मुलीने शिवार रस्ता बंद केला आहे असे वाटले होते. हे म्हणणे खरे आहे की, नवनाथ याने पश्चिमकडील टोकावर दगडांचा ढिग केला व येणा-या जाणा-या लोकांना अडथळा निर्माण केला. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे बेबाबाई व तिचा मुलगा रफीक याने ते दगड बाजूला करून रस्ता मोकळा केला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे आरोपी नवनाथ याला त्याचा राग आला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे आरोपी बेबीबानू व तिच्या मुलासोबत भांडण करून, शिवीगाळ करून दमदाटी करत होते. हे म्हणणे खरे आहे की, रफिक व बेबीबानू यांना समजावण्याचा प्रयत्न करीत होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी आरोपी नवनाथ याने रफिक याला डोक्यावर दगड मारून दुखापत केली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी

बेबीबानू सोडविण्याकरीता गेली तिलाही हातावर मार लागला होता. हे म्हणणे खरे आहे की, तिला डाव्या खांदयावर दुखापत झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी आरोपी शिवाजी याने नवनाथची बाजू घेतली व फिर्यादी, तिच्या मुलाला दमदाटी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी मी, कौतिक ठोंबरे, मुस्ताख पठाण, अजित पठाण यांनी सोडवासोडव केली होती. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व तिच्या मुलाला उपचाराकरीता सरकारी दवाखान्यात नेले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी घटना बघितली असल्याने तसे पोलिसांना जवाबात सांगितले होते व पोलिसांनी माझा जवाब माझया सांगण्याप्रमाणे नोंदवला होता. ज्या लोकांनी फिर्यादी व तिच्या मुलाला मारहाण केली होती ते आज न्यायालयात हजर आहेत. ज्या दगडाने फिर्यादी व तिच्या मुलाला मारहाण झाली तो दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता साक्षीदाराला वस्तु-अ वरील दगड दाखवला. साक्षीदाराने तो ओळखला, तो तोच आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपींतर्फे श्री. सोनवणे वकिल यांच्यामार्फत सुरू :-**

२. मी गट क्रं. २५७ या शेतात राहतो. गट क्रं. २५८ आमचा आहे व तो माझया पत्नीच्या नावाने आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रं. २५८ च्या पूर्व बाजुला पिनू शिवराम यांची मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, पिनू शिवराम यांच्या लगत पूर्व बाजूला निवृत्ती ठोंबरे यांची मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे गट क्रं. २५८ ला लागून पश्चिम दिशेला तुकाराम सोमवंशी याची मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याला लागून पश्चिम दिशेला पिनू शिवराम यांची मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर पश्चिम बाजूला अर्जून कारभारी भोकनळ याची जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, वरील मिळकतीला लागून उत्तरेस साळसाणे ते समिट रेल्वे स्टेशन रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर रस्त्याला लागून उत्तर बाजूकडे फिर्यादीची देवस्थान इनाम ही जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व इतर शेतक-यांच्या मिळकतीच्या पश्चिम बाजूला तळेगाव ते निंबाळे रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, साळसाणे ते समिट रेल्वे स्टेशन रस्ता याबाबत फिर्यादी व आरोपींमध्ये वाद आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरील रस्ता ४ ते ५ वर्षापासून फिर्यादीने बंद केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, रस्ता खुला करून मागण्याकरीता तहसीलदारांकडे प्रकरण सुरू होते. हे मला सांगता येणार नाही की, तहसीलदाराने रस्ता खुला करून देण्याबाबत आदेश दिला होता किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, त्या रस्त्यावरून आजही आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये वाद सुरू आहे.

३. मी सांगितलेली तथाकथीत घटनेबाबत मला स्वत:ची काही एक माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझयासमोर अशी कोणतीही घटना घडली नव्हती. मी न्यायालयात रफीक सोबत आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी रफीकच्या सांगण्यावरून साक्ष दिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, साळसाणे ते रेल्वे समिट रस्ता बंद आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे आम्हांला रफिकच्या शेतातूनच आमच्या शेतात जावे यावे लागते. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

**सा.वा.दा.ब.अ.क.के.** श्रवणोत्तर स्विकृती,

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.07.19 18:11:25 +0530

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चांदवड.**
**दिनांक : १९/०७/२०२५**

**(एस. एस. छल्लाणी)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चांदवड.**